# भारतीय रिझर्व्ह बँक (आरबीआय)
## चलन व्यवस्थापन विभाग
## नागरी सनद

**१. नागरी सनदीचा उद्देश**

नोटा आणि नाणी यांच्या देवाणघेवाणीच्या बाबतीत भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारे प्रदान करण्यात येणाऱ्या विविध सेवांची तसेच आरबीआय प्रचालन कार्यालय व व्यापारी बँकेच्या शाखा यांच्याद्वारे प्रदान करण्यात येणाऱ्या सेवांच्या सर्वसाधारण मानकांची माहिती देण्याचे कार्य नागरी सनदीद्वारे केले जाते.

**२. आरबीआय प्रचालन कार्यालयामध्ये उपलब्ध असणाऱ्या सेवा**

आरबीआय कार्यालये ही, जेथे प्रचालन विभाग कार्यरत आहे, तेथे लोकांना त्यांच्या खराब आणि विरूपित झालेल्या नोटांचा तसेच अप्रचलित किंवा झिजलेल्या नाण्यांचा विनिमय करण्याची सुविधा प्रदान करते. बँकही तिच्या काउंटर्सवर कार्यालयीन वेळेमध्ये विनाशुल्क विनिमय सुविधा प्रदान करण्यास बांधील आहे.

**३. विनिमय सुविधा प्रदान करणाऱ्या आरबीआय कार्यालयांची नावे**

अहमदाबाद, बंगळुरू, बेलापूर (नवी मुंबई), भोपाळ, भुबनेश्वर, चंदीगड, चेन्नई, गुवाहाटी, हैदराबाद, जयपूर, जम्मू, कानपूर, कोची, कोलकाता, लखनौ, मुंबई, नागपूर, नवी दिल्ली, पटना आणि थिरूवनंतपूरम येथे स्थित असलेल्या बँकेच्या प्रादेशिक कार्यालयांमधील काउंटर्सवर ह्या सुविधा प्रदान करण्यात येतात.

**४. नाणे वितरण यंत्राच्या(कॉइन डिस्पेन्सर्सच्या) साहाय्याने नोटांचा विनिमय नाण्यांमध्ये करणे**

रिझर्व्ह बँकेच्या प्रादेशिक कार्यालयांच्या बँकिंग आवारामध्ये बसविण्यात आलेल्या नाणे नाणे वितरण यंत्राचा(कॉइन डिस्पेन्सर्सचा) वापर करून सामान्य जनता ही त्यांच्या नोटांचा विनिमय नाण्यांमध्ये देखील करू शकते.

**५. बँकेच्या सार्वजनिक काउंटरवर खराब आणि विरूपित झालेल्या नाण्यांचा आणि नोटांचा विनिमय**

सामान्य जनता ही बँकेच्या कार्यालयांच्या काउंटरवरून पुढील सेवांचा लाभ घेऊ शकतेः

ए) खराब झालेल्या नोटांचा विनिमय. मळलेली किंवा झीज झाल्यामुळे लहान छेद झालेली किंवा तेल, रंग, शाई इत्यादींमुळे स्वरूप बदललेली नोट ही खराब झालेली नोट मानण्यात येईल. विनिमय सुविधा सुलभ करण्यासाठी, क्रमांक सुरक्षित असलेली मात्र उभ्या पद्धतीने किंवा मध्यभागाच्या जवळ विभागणी झालेली नोट ही खराब झालेली नोट मानण्यात येईल. ज्या नोटांवर राजकीय किंवा धार्मिक घोषणा लिहिलेल्या असतील, त्या नोटांचा विनिमय कोणत्याही परिस्थितीत केला जाणार नाही.

बी) विरूपित नोटांचा विनिमय. विरूपित नोट म्हणजे अशी नोट की, जिचा काही भाग गहाळ झालेला आहे किंवा नोट ही तुकड्यातुकड्यांची बनलेली आहे, परंतु असे की, सादर करण्यात आलेली नोट ही मूळ नोटेच्या अर्ध्या क्षेत्रापेक्षा कमी नसावी, तसेच जर नोट ही तुकडे जोडून बनविण्यात आली असल्यास, प्रत्येक तुकडा हा 'विहित अधिकाऱ्याच्या' (आरबीआय (नोट परतावा) नियमामध्ये व्याख्या करण्यात आल्याप्रमाणे)मते त्याच नोटेचा भाग असल्याची ओळख पटायला हवी.

आरबीआय (नोट परतावा)नियम, १९७५ हे http://www.rbi.org.in या आरबीआयच्या संकेतस्थळावर 'पब्लिकेशन्स' या मुख्य शीर्षकाखाली व 'ओकेजनल पब्लिकेशन्स' या उप-शीर्षकाखाली दाखल करण्यात आलेले आहेत.

सी) नाण्यांचा विनिमय, अप्रचलित नाणी समाविष्ट, नोटांमध्ये किंवा नाण्यांमध्ये करणे

**६. ट्रिपल लॉक रिसेप्टेकल किंवा पोस्ट यांच्याद्वारे प्राप्त झालेल्या विरूपित झालेल्या/तुकडे झालेल्या नोटांचा विनिमय**

विरूपित झालेल्या/तुकडे झालेल्या नोटा ह्या बँकेच्या काउंटरवर सादर करण्यासाठी वेळ नसलेल्या लोकांसाठी नोट विनिमय सुविधा प्रदान करण्याच्या हेतूने, 'ट्रिपल लॉक रिसेप्टेकल (टीएलआर) ' नावाच्या बॉक्समध्ये विरूपित झालेल्या/तुकडे झालेल्या नोटा जमा करण्याची सुविधा बँकेद्वारे प्रदान करण्यात येते. विनिर्दिष्ट काउंटरच्या शेजारी टीएलआर बॉक्स ठेवण्यात येतो आणि सदर नोटा ह्या बंद लिफाफ्यामध्ये ठेवून नंतर त्या बॉक्समध्ये टाकायच्या असतात, चौकशी काउंटरवरून लिफाफा देण्यात येतो. टेंडरर्सनी त्यांनी सादर करण्यात येणाऱ्या नोटांचा तपशील, त्यांचे नाव, पत्ता, आणि बँक खाते क्रमांक इत्यादी माहिती लिफाफ्यावर लिहणे आवश्यक आहे. खात्रीलायक आणि नोंदणीकृत पोस्टाद्वारे देखील आरबीआयच्या कार्यालयांमध्ये विरूपित नोटा पाठविल्या जाऊ शकतात. टेंडरर्सनी त्यांच्या स्वतःच्या हितासाठी असे लिफाफे हे खात्रीलायक आणि नोंदणीकृत पोस्टाद्वारे पाठविणे गरजेचे आहे. नोट परतावा नियमांनुसार नोटांचे प्रदेय असलेले विनिमय मूल्य हे टेंडररच्या बँक खात्यामध्ये इलेक्ट्रॉनिक समाशोधन सेवेद्वारे (ईसीएसद्वारे)/ इलेक्ट्रॉनिक निधी हस्तांतरणाद्वारे (ईएफटीद्वारे) जमा करण्यात येते, सध्याच्या घडीला ही सुविधा विनाशुल्क प्रदान करण्यात येते. टेंडररचे बँक खाते नसल्यास अथवा त्याच्या वास्तव्याच्या ठिकाणी समाशोधन सेवा/ ईएफटीची तरतुद नसल्यास, बँक ड्राफ्ट (अधिकर्ष)/मनी ऑर्डर (धनप्रेष) यांच्या माध्यमातून व टेंडररच्या स्वतःच्या खर्चाने विनिमय मूल्याचे वित्तप्रेषण केले जाते. टीएलआर ही सुविधा केवळ विरूपित झालेल्या/तुकडे झालेल्या नोटांसाठीच उपलब्ध आहे, ही सुविधा खराब झालेल्या नोटांसाठी देण्यात येत नाही.

**७. सेवेची सर्वसाधारण स्थिती**

(i) बँकेच्या काउंटरवर प्रदान करण्यात येणारी विनिमय सुविधा ही बँकेच्या संबंधित प्रादेशिक कार्यालयाच्या कार्यालयीन वेळेदरम्यान उपलब्ध राहील आणि ही सुविधा विनाशुल्क उपलब्ध आहे.

(ii) बँकेच्या प्रत्येक कार्यालयातील ज्या काउंटरवर विनिमय सुविधा उपलब्ध आहे, त्या काउंटरचा अनुक्रमांक हा बँकेच्या हॉलमध्ये प्रदर्शित करण्यात येतो.

(iii) सामान्य कार्यालयीन तास संपल्यानंतर एक तासापर्यंत विरूपित झालेल्या/ तुकडे झालेल्या नोटा ह्या बंद लिफाफ्यामधून ट्रिपल लॉक रिसेप्टेकलद्वारे स्वीकारल्या जातील.

(iv) भारतीय रिझर्व्ह बँकेच्या (नोट परतावा)नियमांनुसार अनुग्रह म्हणून विरूपित झालेल्या/तुकडे झालेल्या नोटा विनिमयासाठी बँकेद्वारे स्वीकारल्या जातील. विरूपित झालेली/तुकडे झालेली नोट ही नियमांनुसार प्रदेय नसल्याचे आढळल्यास, सदर नोट नाकारण्यात येईल आणि टेंडररला नाकारणी सूचना पाठविण्यात येईल. नाकारण्यात आलेली नोट बँकेकडे ठेवण्यात येईल आणि ४ महिन्यांनंतर तिची विल्हेवाट लावण्यात येईल.

(v) नोटा/नाणी हे बनावट/नकली असल्याचे आढळल्यास, त्या नोटा/नाणी जप्त केले जातील आणि त्यांचे कोणतेही मूल्य प्रदान करण्यात येणार नाही. टेंडररला सूचना पाठविण्यात आल्यानंतर सदर नोटा/नाणी बँकेकडे ठेवण्यात येतील.

(vi) आरबीआयद्वारे निर्गमित करण्यात आलेली बँक नोटविषयीची सुरक्षा वैशिष्ट्ये ही बँकेच्या http://www.rbi.org.in/currency/banknotes.html या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

(vii) आरबीआयच्या कोणत्याही कार्यालयामध्ये वरील विनिमय सुविधा प्राप्त करण्यास एखाद्या व्यक्तीला कोणतीही अडचण आल्यास किंवा त्या व्यक्तीकडे लाच मागितली गेल्यास, ती व्यक्ती प्रादेशिक कार्यालयाच्या चौकशी काउंटरवर ठेवण्यात आलेल्या तक्रार पुस्तिकेमध्ये/रजिस्टरमध्ये तक्रारीची नोंद करू शकते किंवा संबंधित आरबीआय कार्यालयाच्या प्रचालन विभागाच्या प्रमुखांना सदर बाब निदर्शनास आणून देऊ शकते. प्रमुख व्यक्तींचे पत्ते आणि त्यांचे पदनाम हे जोडपत्रामध्ये देण्यात आलेले आहेत.

(xiv) रिझर्व्ह बँकेचे कर्मचारी आणि अधिकारी हे प्रत्येक व्यक्तीशी सौजन्याने आणि आस्थेने वर्तणूक करतील. कर्मचारीवर्ग मदतीस सदैव तत्पर राहील आणि ग्राहकांच्या प्रश्नांकडे आणि तक्रारींकडे त्वरीत लक्ष देतील.

**८. विरूपित झालेल्या/ तुकडे झालेल्या नोटांचा व्यापारी बँकांच्या काउंटरवर विनिमय**

(i) रिझर्व्ह बँकेची कार्यालये ही निवडक ठिकाणी स्थित आहेत. म्हणून बँकेने, खराब झालेल्या नोटांच्या विनिमयाची सुविधा पुरविण्यासाठी, तसेच नोटांचा विनिमय नाण्यामध्ये करण्याची आणि नाण्यांचा विनिमय नोटांमध्ये करण्याची सुविधा पुरविण्यासाठी अनुसूचित व्यापारी बँकांमध्ये व्यवस्था करण्यात आली आहे. खराब झालेल्या नोटांच्या विनिमयाची सुविधा ही सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या सर्व शाखांमध्ये आणि खाजगी क्षेत्रातील बँकांच्या चलन पेटी शाखांमध्ये उपलब्ध आहे, विरूपित झालेल्या/तुकडे झालेल्या नोटांच्या विनिमयाची सुविधा ही केवळ व्यापारी बँकांच्या चलन पेटी शाखांमध्येच उपलब्ध आहे. विरूपित झालेल्या नोटांचा विनिमय ज्या चलन पेटी शाखांमध्ये करता येतो, त्या शाखांची यादी आरबीआय कार्यालयाच्या चौकशी काउंटरवर उपलब्ध आहे. विरूपित नोटांच्या विनिमयाची सुविधा उपलब्ध असण्याच्या संबंधात नोटीस बोर्ड प्रदर्शित करण्याची सूचना सदर चलन पेटी शाखांना देण्यात आली आहे. अशा प्रकारच्या सदर शाखेने विनिमय सुविधा पुरविण्यास नकार दिल्यास, पीडित व्यक्ती ही संबंधित व्यापारी बँकेच्या अध्यक्षांकडे आणि व्यवस्थापकीय संचालकांकडे/सीईओकडे तक्रार दाखल करू शकते. तक्रारींचे निवारण न झाल्यास, सदर प्रकरण हे भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संबंधित प्रादेशिक कार्यालयाच्या निदर्शनास आणून देता येऊ शकते.

(ii) इतर बँकेच्या शाखा, म्हणजेच सहकारी बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँका यांनी त्यांच्या सोयीनुसार नोटा आणि नाणी यांचा विनिमय करणे अपेक्षित आहे. परंतु, त्यांना विरूपित झालेल्या नोटांचा विनिमय करण्याचा अधिकार नाही.

**९. सूचना/अभिप्राय**

नागरी सनदीच्या संबंधात एखाद्या व्यक्तीला कोणतीही सूचना/कोणताही अभिप्राय द्यायचा असल्यास, प्रमुख महाव्यवस्थापक, चलन व्यवस्थापन विभाग, भारतीय रिझर्व्ह बँक, मध्यवर्ती कार्यालय, शहीद भगत सिंग मार्ग, मुंबई-४०० ००१ येथे, ती व्यक्ती लिखित स्वरूपात आपली सूचना/अभिप्राय पाठवू शकते.

## जोडपत्र

## आरबीआय प्रचालन कार्यालयांचे पत्ते आणि त्यांचे अधिकारक्षेत्र

| अनु क्र. | आरबीआय कार्यालयाचे नाव आणि पत्ता | अधिकारक्षेत्र |
|---|---|---|
| 1 | महाव्यवस्थापक<br>भारतीय रिझर्व्ह बँक, प्रचालन कार्यालय,<br>दुसरा मजला, गांधी पूलाच्या जवळ, अहमदाबाद ३८० ०१४ | गुजरात राज्य आणि दादरा, नगर हवेली व दमन आणि दिव यांचे केंद्रशासित प्रदेश |
| 2 | महाव्यवस्थापक<br>भारतीय रिझर्व्ह बँक, प्रचालन कार्यालय,<br>१०३/८, नृपथुंगा रोड, बंगळूरू- ५६० ००१ | कर्नाटक राज्य |
| 3 | उप महाव्यवस्थापक<br>भारतीय रिझर्व्ह बँक, प्रचालन कार्यालय,<br>पंडीत जवाहरलाल नेहरू मार्ग, पोस्ट बॉक्स क्र. १६,<br>भुबनेश्वर- ७५१ ००१ | ओरीसा राज्य |
| 4 | महाव्यवस्थापक<br>भारतीय रिझर्व्ह बँक, प्रचालन कार्यालय,<br>मुख्य इमारत, शहीद भगत सिंग मार्ग,<br>फोर्ट, मुंबई-४०० ००१ | बृहन्मुंबई म्हणजेच मुंबई बेट आणि उपनगरी जिल्हे (ढोबळमानाने पश्चिम आणि मध्य रेल्वे यांच्यावरील अनुक्रमे दहिसर आणि मुलुंड यांना जोडणाऱ्या रेषेची दक्षिण बाजू) |
| 5 | उप महाव्यवस्थापक<br>भारतीय रिझर्व्ह बँक, प्रचालन कार्यालय,<br>होशंगाबाद रोड, पोस्ट बॉक्स क्र.३२, भोपाळ ४६२ ०११ | मध्यप्रदेश राज्य |
| 6 | उप महाव्यवस्थापक<br>भारतीय रिझर्व्ह बँक, प्रचालन कार्यालय,<br>प्लॉट क्र.३, सेक्टर १०, एच.एच.निर्मला देवी मार्ग,<br>सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई- ४०० ६१४ | महाराष्ट्र राज्यातील अहमदनगर, कोल्हापूर, नाशिक, पूणे, रायगड, रत्नागिरी, सांगली, सातारा, सिंधूदुर्ग, सोलापूर व ठाणे जिल्हा, गोवा राज्य |
| 7 | उप महाव्यवस्थापक<br>भारतीय रिझर्व्ह बँक, प्रचालन कार्यालय,<br>सेंट्रल विस्टा, टेलिफोन भुवनच्या समोर,<br>सेक्टर १७, चंदीगड- १६० ०१७ | हरयाणा, हिमाचल प्रदेश, पंजाब राज्ये आणि चंदीगडचा केंद्रशासित प्रदेश |
| 8 | महाव्यवस्थापक<br>भारतीय रिझर्व्ह बँक, प्रचालन कार्यालय,<br>फोर्ट ग्लासिस क्र.१६, राजाजी सलाई, पोस्ट बॉक्स क्र. ४०,<br>चेन्नई-६०० ००१ | तामिळनाडू राज्य आणि पाँडेचरीचा केंद्रशासित प्रदेश |
| 9 | महाव्यवस्थापक<br>भारतीय रिझर्व्ह बँक, प्रचालन कार्यालय,<br>स्टेशन रोड, पानबाझार, पोस्ट बॉक्स क्र. १२०,<br>गुवाहाटी-७८१ ००१ | आसाम, अरूणाचल प्रदेश, मणीपूर, मेघालय, मिझोराम, नागालॅन्ड आणि त्रिपूरा राज्ये |
| 10 | महाव्यवस्थापक<br>भारतीय रिझर्व्ह बँक, प्रचालन कार्यालय,<br>६-१-६५, सेक्रेटरीयट रोड, सैफाबाद,<br>हैद्राबाद-५०० ००४ | आंध्रप्रदेश राज्य |
| 11 | उप महाव्यवस्थापक<br>भारतीय रिझर्व्ह बँक, प्रचालन कार्यालय,<br>रेल हेड कॉम्प्लेक्स, जम्मू-१८० ०१२ | जम्मू आणि काश्मिर राज्य |
| 12 | महाव्यवस्थापक<br>भारतीय रिझर्व्ह बँक, प्रचालन कार्यालय,<br>रामबाग सर्कल, टोंक रोड, पोस्ट बॉक्स क्र.१२,<br>जयपूर- ३०२ ००४ | राजस्थान राज्य |
| 13 | महाव्यवस्थापक<br>भारतीय रिझर्व्ह बँक, प्रचालन कार्यालय,<br>एम.जी.मार्ग, पोस्ट बॉक्स क्र. ८२/१४२,<br>कानपूर-२०८००१ | उत्तर प्रदेश आणि उत्तरांचल राज्ये |
| 14 | महाव्यवस्थापक<br>भारतीय रिझर्व्ह बँक, प्रचालन कार्यालय,<br>पोस्ट बॉक्स क्र.४९,<br>कोलकाता- ७०० ००१ | सिक्कीम, पश्चिम बंगाल आणि अंदमान व निकोबार बेटांचा केंद्रशासित प्रदेश |
| 15 | महाव्यवस्थापक<br>भारतीय रिझर्व्ह बँक, प्रचालन कार्यालय,<br>मुख्य कार्यालय इमारत, डॉ. राघवेंद्रराव रोड, पोस्ट बॉक्स क्र.१५,<br>सिवील लाइन्स, नागपूर-४४० ००१ | छत्तीसगड राज्य आणि महाराष्ट्र राज्यातील अकोला, अमरावती, औरंगाबाद, बीड, भंडारा, बुलढाना, चंद्रपूर, धुळे, गडचिरोली, हिंगोली, जळगाव, जालना, लातूर, नागपूर, नांदेड, उस्मानाबाद, परभणी, वर्धा, यवतमाळ जिल्हे |
| 16 | महाव्यवस्थापक<br>भारतीय रिझर्व्ह बँक, प्रचालन कार्यालय,<br>६, संसद मार्ग, नवी दिल्ली- ११० ००१ | दिल्ली राज्य |
| 17 | उप महाव्यवस्थापक<br>भारतीय रिझर्व्ह बँक, प्रचालन कार्यालय,<br>दक्षिण गांधी मैदान,<br>पोस्ट बॉक्स क्र. १६२, पटना-८०० ००१ | बिहार आणि झारखंड राज्य |
| 18 | उप महाव्यवस्थापक<br>भारतीय रिझर्व्ह बँक, प्रचालन कार्यालय,<br>बेकरी जंक्शन,<br>पोस्ट बॉक्स क्र.६५०७, थिरूवनंतपूरम-६९५ ०३३ | केरळा राज्य आणि लक्षद्वीपचा केंद्रशासित प्रदेश |